# Good Work Of Nagpur Rural Police

## वाहतूक शाखे मार्फत (DAR) सविस्तर अपघात अहवाल संबंधित एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

जिल्हा नागपूर ग्रामीण पोलीसांच्या वतीने जिल्हा वाहतूक शाखा अंतर्गत मा. सर्वोच्च न्यायालय व दिल्ली यांचे दिशानिर्देशानूसार जयप्रकाश विरूध्द नॅशनल इंशुरन्स सुप्रीम कोर्ट विशेष क्रमांक 11801–11804/2005 दिनांक 13/5/2016 व दिल्ली हायकोर्ट पिटिशन क्रमांक 842/2013 मध्ये राजेश त्यागी विरूध्द जयबीरसिंग दिनांक 16/12/2009 रोजी दिलेल्या निकालाप्रमाणे सविस्तर अपघात अहवाल (व|ट) बाबत विहीत नमुना तयार करून संपूर्ण महाराष्ट्रात सदर कार्यप्रणाली ची अमंलबजावणी दिनांक 01/04/2017 पासुन लागू करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे यांचे मार्गदर्शनाखाली (व|ट) ची अमंलबजावणी करण्यात येते आहे. श्री. शैलेश बलकवडे पोलीस अधिक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे प्रेरणेतून व|ट ची तंतोतंत अंमलबजावणी होणेस्तव पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण येथे दिनांक 06/11/2017 रोजी (व|ट) कार्यप्रणालीबाबत सकाळी 11.00 वा. ते दुपारी 15.30 वा. पर्यंत कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती. सदर कार्यशाळेत श्री. कुणाल जाधव दिवानी न्यायधीश वरिष्ठस्तर तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नागपूर, डॉ. श्री. एम.एस. व्यवहारे न्यायवैद्यकशास्त्र, तथा विषशास्त्र विभाग प्रमुख मेयो रूग्णालय नागपूर, डॉ. रूपकुमार बेलसरे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर ग्रामीण श्री. आर. बी. सिंग, क्षेत्रिय प्रबंधक, व ॲड. श्री. सि.व्ही. पांडे, दि न्यू इंडीया इन्शुरन्स कंपनी नागपूर, श्री. धिरेश वरखडे, श्रीमती ख्रीस्तीना थॉमस विधी विभाग प्रमुख दि ओरीयंटल इंशुरन्स कंपनी नागपूर, श्री.पी.एस. ठाकुर, श्री. एस. एस. भुरे, श्री. शेखर बावणे, विधी विभाग प्रमुख, युनायटेड इंडीया इशुरन्स कंपनी नागपूर, यांचे उपस्थितीत (व|ट) फॉर्म बाबत माहिती तसेच एखादया अपघातात पोलीस स्टेशन येथे दाखल झालेल्या गुन्हयांसंबंधात अपघात दावा प्राधिकरणास प्रकरण कसे दाखल करावे वर नमुद विविध विभागांकडुन माहिती कशी संकलीत करावी. त्याबाबत येणाऱ्या अडचणींचे कसे निराकरण करावे, याबद्दल प्रामुख्याने मार्गदर्शन करण्यात आले व (व|ट) म्हणजे काय? त्याची सुरवात कशी? केव्हा झाली? त्याचप्रमाणे त्याची आज गरज का भासली याबाद्दल कार्यशाळेत सविस्तर विवेचन करण्यात आले.

यामागील हेतू स्पष्ट करतांना वक्त्यांनी असे सांगितले की, एखादा मोटार अपघात झाल्यानंतर त्याच्या वारसांना वेळीस प्रतीपूर्ति वेळेच्या आत लवकरात–लवकर मिळूण देणे हा यामागचा प्रामाणिक उद्देश आहे.

सदर कार्यशाळा श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, श्री. नरसिंग शेरखाने, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, श्री. कैलाश गावडे पोलीस उपअधिक्षक(गृह) नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक आसीफराजा शेख, पोलीस उपनिरीक्षक श्री. नरेंद्र गौरखेडे, श्री. सतीश सोनटक्के पोलीस उपनिरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा नागपूर ग्रामीण यांनी यशस्वीरित्या पार पाडली तसेच सदर कार्यशाळेत जिल्हयातील पोलीस स्टेशन मधुन एकुण 70 ते 80 अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.






(DAR) सविस्तर अपघात अहवाल कार्यशाळे मध्ये उपस्थित अधिकारी व कर्मचारी

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर